// सा विद्या या विमुक्तये //
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
''ज्ञानतीर्थ'' परिसर, विष्णूपुरी, नांदेड—४३१ ६०६ (महाराष्ट्र)
SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED
"Dnyanteeerth", Vishnupuri, Nanded – 431606 (Maharashtra)
Establishment on 17th September 1994 -Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'A' Grade

## ACADEMIC (AFFILIATION) SECTION

Phone : (02462) 229242/43
Fax : (02462) 229245 / 229325
Website : srtmun.ac.in
e-mail : affi.srtmun@gmail.com

यु.जी.सी.ने विविध योजनेंतर्गत महाविद्यालयामध्ये मंजूर केलेल्याB.Voc.सह विविध अभ्यासक्रम व ऐच्छिक विषयासाठी शासन मान्यता घेणेकरीता प्रस्ताव सादर करणे बाबत.

### :: परिपत्रक ::

संदर्भ :— मा. कक्ष अधिकारी, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई—३२ यांचे पत्र क्र. संकीर्ण— २०१९/(३२२/१९)/मशि—४, दि. १५ जुलै २०१९.

प्रस्तुत विद्यापीठाशी संलग्नीत असलेल्या सर्व महाविद्यालयांना कळविण्यात येते की, ज्या महाविद्यालयांना यु.जी.सी. ने विविध योजनेंतर्गत **B.Voc.** सह विविध अभ्यासक्रम व ऐच्छिक विषय मंजूर केलेले आहेत व त्यांचा कालावधी संपलेला आहे, परंतु सद्य स्थितीत सदर अभ्यासक्रम व ऐच्छिक विषयांचे संलग्नीकरण चालू आहे, अशा महाविद्यालयांनी त्यांच्या महाविद्यालयात सुरु असलेल्या अभ्यासक्रम व विषयांना निरंतर संलग्नीकरण चालू ठेवणेसाठी नियमानुसार शासन मान्यतेची आवश्यकता आहे.

सदर अभ्यासक्रम व विषयांना निरंतर मान्यता चालू ठेवण्यासाठी माहे. सप्टेंबर २०१९ मध्ये शासन मान्यतेकरीता विहीत पध्दतीने प्रस्ताव व शुल्क विद्यापीठास सादर करावे, जेणे करुन या अभ्यासक्रम व विषयांना शासन मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव पुढील कार्यवाहीसाठी शासनाकडे पाठविण्यात येईल. शासन मान्यतेनंतरच याबाबतची संलग्नीकरणाची कार्यवाही विद्यापीठातर्फे करण्यात येईल.

या संदर्भातील विहीत प्रस्ताव व शुल्क उपरोक्त विहीत कालावधीत म्हणजेच ३० सप्टेंबर २०१९ पर्यंत सादर न केल्यास सदरील अभ्यासक्रम व विषय आपणास पुढील शैक्षणिक वर्ष २०२०—२०२१ या वर्षा पासून सुरु करता येणार नाहीत व याची सर्वस्वी जबाबदारी संस्था व प्राचार्यांवर राहील याची कृपया नोंद घ्यावी. कळावे.

सदरचे परिपत्रक हे विद्यापीठाच्या **www.srtmun.ac.in** या संकेतस्थळावर **affiliation** या शिर्षकांतर्गत प्रसिध्द करण्यात आले आहे.

''ज्ञानतीर्थ'', परिसर, )(
विष्णूपुरी, नांदेड—४३१६०६. )(
जा.क्र.शैक्षणिक/संलग्न—०३/२०१९—२०२०/957 )(
दिनांक :— १४.०८.२०१९. )(

उपकुलसचिव
शैक्षणिक (संलग्निकरण) विभाग

प्रत माहिती तथा योग्य त्या कार्यवाहीस्तव :—

१. मा. प्राचार्य, सर्व संलग्नीत महाविद्यालये, प्रस्तुत विद्यापीठ.
२. सिनीयर प्रोग्रामर, विद्यापीठ अनुदान आयोग कक्ष/शैक्षणिक विभाग प्रस्तुत विद्यापीठ यांना देऊन कळविण्यात येते की, सदर परिपत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर affiliation या शिर्षकांतर्गत प्रसिध्द करावे.

कुलसचिव कार्यालय
स्वा. रा. ती. म. विद्यापीठ
नांदेड-४३१६०६
2561 दिनांक 30/7/19

महाराष्ट्र शासन

क्र.संकीर्ण-२०१९/(३२२/१९)/मशि-४
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक :- १५ जुलै, २०१९.

प्रति,
प्र. कुलगुरू,
सर्व अकृषी विद्यापीठे,
महाराष्ट्र राज्य.

आ. क्र. 1245 दिनांक 1/8/19
महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ,
स्वा. रा. ती. मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

विषय :- बी.व्होक अभ्यासक्रम व कम्युनिटी कॉलेजला मान्यता देणेसंदर्भात.

महोदय,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणांस असे कळविण्याचे निर्देश आहेत की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०९ (७)(क) व कलम १०९ (७)(ख) अनुसार कोणतेही व्यवस्थापन, राज्य शासनाच्या पुर्वपरवानगीखेरीज कोणतेही नवीन महाविद्यालय, परिसंस्था तसेच नवीन अभ्यास पाठयक्रम, विषय, विद्याशाखा किंवा अतिरिक्त तुकडी किंवा सॅटेलाईट केंद्रे सुरू करणार नाही अशी तरतूद आहे.

मात्र, बी.व्होक अभ्यासक्रम तसेच कम्युनिटी कॉलेज शासन मान्यतेशिवाय सुरू करण्यात येत असून त्यास विद्यापीठाकडून संलग्निकरण देण्यात येत असल्याची बाब निदर्शनास आलेली आहे. असे संलग्निकरण विद्यापीठाकडून शासन मान्यतेच्या अधीन देण्यात येते व त्यानंतर प्रस्ताव शासन मान्यतेसाठी सादर करण्यात येतो. शासन स्तरावर प्रस्तावाची छाननी केली असता प्रस्तावामध्ये बऱ्याच त्रुटी आढळून येत असून त्याची पुर्तता विद्यापीठाकडून केली जात नसल्याने किंबहूना असे प्रस्ताव विद्यापीठांकडून गांभीर्यपूर्वक तपासले गेले नसल्याचे निदर्शनास येत असून अभ्यासक्रम शासन मान्यतेशिवाय सुरू करण्यात आल्याने विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हिताचा प्रश्न उपस्थित होत आहे.

शासन मान्यतेशिवाय अभ्यासक्रम सुरू करण्याची बाब ही महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०९ (७)(क) व कलम १०९ (७)(ख) मधील तरतूदींचा भंग करणारी आहे. त्यामुळे सर्व अकृषी विद्यापीठांना कळविण्यात येते की, शासन मान्यतेशिवाय बी.व्होक/ कम्युनिटी कॉलेज अभ्यासक्रम तसेच इतर कोणतेही अभ्यासक्रम शासन मान्यतेशिवाय सुरू करण्यात येऊ नयेत. तसेच अशा अभ्याक्रमांना विद्यापीठांकडून संलग्निकरण देण्यात येऊ नये, असे झाल्यास

शासन स्तरावर त्याची गंभीर दखल घेण्यात येऊन संबंधितांवर जबाबदारी निश्चित करण्यात येईल, या सूचना विद्यापीठांनी सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणण्यात याव्यात.

यास्तव विद्यापीठ अधिनियमातील नमूद तरतूद विचारात घेता, शासन मान्यतेशिवाय किंवा मान्यतेच्या अधीन राहून कोणतेही अभ्यासक्रम सुरू करण्यात येऊ नयेत अशा सूचना सर्व अकृषी विद्यापीठांना देण्यात येत आहेत.

(द. व. खारके)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत:

१) संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२) निवडनस्ती (मशि-४)

c:\users\pranita.raut\desktop\मनोज\१५.०५.२०१९ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त b.voc course.docx